# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.09.2025** **वार- शनिवार**

---

**<u>सायकल रॅली</u>**

शारीरिक स्वास्थ्य, पर्यावरण सरंक्षणासाठी सायकल चालवणं अतिशय उपयुक्त आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट इंडियाचा नारा दिला असून, त्यांनी दिलेल्या पंचसुत्रीवर पुणेकरांनी आपलं आरोग्य चांगलं राखावं ,असं प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पुण्यात आज राज्यसभा खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या पुढाकाराने पुणे ऑन पेडल्स सायकल रॅली आणि पुणे वॉकेथॉनचं आयोजन करण्यात आलं होतं,त्यावेळी ठाकूर बोलत होते.

**<u>स्वस्थ नारी</u>**

“स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान” संपूर्ण भारतभर तसेच पुणे जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा उद्देश महिला आणि बालकांची आरोग्य तपासणी करून कुटुंबाचे आरोग्य सुदृढ करणे हा आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक बालक आणि महिलांनी सहभागी होऊन आरोग्य तपासणी करून घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी केले आहे.

**<u>जनसंवाद</u>**

पालकमंत्री म्हणून माझ्यावरती जबाबदारी आहे.त्यामुळे सगळ्या नागरिकांचे प्रश्न सुटतील. कोणावरही अन्याय होणार नाही. असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना केलं. हडपसर मध्ये आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत जनसंवादाचं आयोजन करण्यात आलं होतं,त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी उपस्थित नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या.

**‘सारथी सोनचीरैया’**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन आणि पुनर्वसन विभागामार्फत शहरात महिलांना केंद्रस्थानी ठेवून ‘सारथी सोनचीरैया’ हा एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत महिला बचत गटांच्या प्रतिनिधींमार्फत झोपडपट्टीवासियांना सेवाकर बिलांचे वितरण आणि मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलित केली जात आहे. मार्च २०२५ पासून सेवाकर बिलांचे वितरण या उपक्रमांतर्गत सुरू झाल असून तेव्हापासून आतापर्यंत झोपडपट्टीवासियांनी या उपक्रमाला चांगला प्रतिसाद देत जवळपास ७६ लाख  ८३ हजार ३९७ रुपयांचा विक्रमी सेवाकर जमा केला आहे.

**पेरण्या पूर्ण**

पुणे जिल्ह्यातील खरीप हंगामाच्या पिकांचं लागवडीखालील सरासरी क्षेत्र 2 लाख 2 हजार 263 हेक्टर इतके आहे, त्यापैकी 2 लाख 10 हजार 301 हेक्टरवर पेरण्या पूर्ण झाल्या असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली. पिकांच्या पेरण्यांखालील क्षेत्रवाढीमुळे खरीप उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. मात्र, कीड आणि रोगांमुळे विक्रमी धान्योत्पादनाऐवजी किमान सरासरी उत्पादन हाती येईल, असेही काचोळे म्हणाले.

**जिल्हा परिषद**

जिल्हा परिषदेच्या दिव्यांग शिक्षकांच्या प्रमाणपत्रांची फेरतपासणी निश्चित झाली असून ससून रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालयाकडून ही तपासणी केली जाईल, वेळापत्रकानुसार बदलीपात्र दिव्यांग शिक्षकांच्या प्रमाणपत्रांची तपासणी केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली.

**प्रभाग रचना हरकती**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी बनवलेल्या प्रारूप प्रभागरचनेवर हरकती आणि सूचनावरील सुनावणी आज पुर्ण झाली. त्यात सर्वाधिक हरकती या प्रभाग रचना करताना नैसगिक सीमा रेषांचे उल्लघन झाल्याचा होत्या. पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी नगरसेवकांची संख्या १६५ असून, ४१ प्रभाग आहेत. त्यापैकी ४० प्रभाग चार सदस्यीय, तर ३८ क्रमांकाचा आंबेगाव-कात्रज प्रभाग पाच सदस्यीय आहे.

**शिक्षक पात्रता परीक्षा**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात येणारी ‘महाराष्ट्र शिक्षक पात्रता म्हणजे  टीईटी २०२५’ ही परीक्षा २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व व्यवस्थापनांच्या आणि सर्व परीक्षा मंडळांच्या

शाळांमध्ये शिक्षक सेवक आणि शिक्षक पदासाठी होणाऱ्या या पात्रता परीक्षेचे ऑनलाइन अर्ज येत्या सोमवारपासून भरता येणार आहेत. तीन ऑक्टोबरपर्यंत परीक्षेसाठी हे अर्ज करता येणार आहेत.

**DEMU सेवा**

अमळनेर-बीड दरम्यान बहुप्रतिक्षित DEMU सेवा लवकरच सुरू होणार आहे. दरम्यान, १४, १५ आणि १६ सप्टेंबर रोजी या विभागात गाडीच्या वेगाची चाचणी घेण्यात येणार असल्याचं पुणे रेल्वे विभागातर्फे कळविण्यात आलं आहे. नियमित प्रवासी सेवा सुरू करण्यापूर्वी ट्रॅकची अखंडता, सिग्नल यंत्रणा आणि सुरक्षा मानक पडताळण्यासाठी ही चाचणी घेण्यात येत आहे.

**नदी पुनरुज्जीवन**

नदीलगतच्या नागरिकांच्या पूरमुक्तीसाठी पुणे महापालिकेने नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी ३६९ कोटींचा प्रस्ताव तयार केला असून त्यास पूर्वगणना  समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.एकतानगर, विठ्ठलनगर आणि या भागातील नदीलगतच्या नागरिकांच्या पूरमुक्तीसाठी महापालिकेने निधीला मंजुरी दिली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज सकाळपासून ढगाळ हवामान असून अधूनमधून मध्यम ते हलक्या पावसाच्या सरी पडत आहेत. आज कमाल तापमान 28 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 21 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. उद्या शरात हलक्या ते माध्यम पावसाची शकयता असून घाट माथ्यावर मात्र जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**